
# महात्मा फुले
# शिक्षण हमी योजना

SAMARTHAN
IN: 848
DT: 19/12/04
MUMBAI-2.



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे

दिनांक १३ ऑक्टोबर २००० व दिनांक १५ मे २००१ रोजी

जाहीर झालेले शासन निर्णय एकत्रित स्वरुपात.

६ ते १४ वयोगटातील ग्रामीण व शहरी भागातील बालकामगार, झोपडपट्टीतील मुले, निराधार मुले, फेरीवाले, घरगडी अशा प्रतिकूल परिस्थितीतील शिक्षणापासून वंचित राहिलेली मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली

# ''महात्मा फुले शिक्षण हमी योजना''


**स्वयंसेवी संस्थांसाठी मार्गदर्शिका**

'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' स्वयंसेवी संस्थांना प्रभावीपणे कशी राबविता येईल याची माहिती देणारी पुस्तिका आम्ही लवकरच प्रकाशित करीत आहोत.

**किंमत रुपये २५/-**

कृपया आपली मागणी लवकरात लवकर 'समर्थन'कडे नोंदवावी.

**समर्थन** : द्वारा - विधायक संसद, ८७/३, मुंबादेवी म्युनिसिपल शाळा, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२

✆ २४२ ५२९२, २४२ ८२९१. E-mail - vsansad@bom3.vsnl.net.in

**दिनांक १५ मे २००१ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार सुधारणा व बदल ठळक अक्षरात.**

राज्यातील ६-१४ वयोगटातील बालकामगार आणि
अन्य शाळाबाह्य मुलांचे शिक्षण
**महात्मा फुले शिक्षण हमी योजना** सुरू करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक - पीआरई २०००/ (२६०१)/ प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ ऑक्टोबर २००० व १५ मे २००१

**प्रस्तावना :**

६ ते १४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यात १.५ कि. मी. परिसर व २०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शाळांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तथापि आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात ही सुविधा १ कि. मी. परिसर व १०० लोकवस्तीसाठी उपलब्ध करून देण्यात येते.

शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना प्राथमिक शाळेत दाखल करून घेण्याच्या व दर्जेदार प्राथमिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व साक्षरता यावर सन १९९४ मध्ये एक कृति कार्यक्रम तयार केला होता. या कृति कार्यक्रमाची अंमलबजावणी १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढावी, गळती कमी व्हावी व विद्यार्थ्यांना दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी राज्यात पूर्वीपासून कार्यान्वित असलेल्या तसेच या कृति कार्यक्रमामध्ये शिफारस केलेल्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

* सर्व मुलांना इयत्ता १० वी पर्यंत मोफत शिक्षण.
* सर्व मुलींना इयत्ता १२ वी पर्यंत मोफत शिक्षण.
* मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश व लेखन साहित्य.
* इयत्ता ५ वी पर्यंत मुलींना उपस्थिती भत्ता.
* इयत्ता ५ वी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना दरमहा तीन किलो मोफत धान्य पुरवठा.
* शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटातील इयत्ता ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश.
* सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना
* केंद्र प्राथमिक शाळांची स्थापना.
* प्राथमिक शाळांना रेडिओ कम् कॅसेट प्लेअर व दूरदर्शन संच पुरविणे.

* प्राथमिक शाळांना भौतिक व शैक्षणिक सुविधांसाठी शिक्षकांच्या वेतनाच्या ४ टक्केपर्यंत सादील अनुदान
* पटनोंदणी सप्ताह
* वस्तीशाळा

या सर्व उपाययोजनांमुळे राज्यातील ६ ते १४ वयोगटातील मुलांचे प्राथमिक शाळेतील पटनोंदणीचे प्रमाण निश्चितपणे वाढत आहे. असे असले तरी शाळेत जाण्यायोग्य वयाची सर्व मुले/मुली अद्याप प्राथमिक शाळेत दाखल होऊ शकलेली नाहीत. तसेच कौटुंबिक /आर्थिक कारणास्तव बरीच मुले प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. विशेषत: ग्रामीण भागात शेती, पशुसंवर्धन, उसतोड, वीटभट्ट्या इत्यादी कामांमध्ये अनेक मुले गुंतलेली आहेत. शहरी भागात झोपडपट्टीत राहणारी मुले, निराधार मुले, हमाली करणारी मुले, कचरा गोळा करणारी/ घरगडी मुले, शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकणार नाही, हे विचारात घेऊन शासनाने शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका राज्यस्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीने शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी एक योजना तयार केली असून त्या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. दरम्यानच्या काळात केंद्र शासनाने ''शिक्षण हमी योजना व नाविन्यपूर्ण पर्यायी शिक्षण'' योजना तयार केली आहे व त्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान स्वरुपात आर्थिक मदत मिळणार आहे. केंद्र शासन पुरस्कृत योजनेची अंमलबजाबणी सर्व राज्यांनो करणे अपेक्षित आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या दृष्टीने शासनाने आतापर्यंत राबविलेल्या योजनांमुळे जास्तीत जास्त मुले शाळेत दाखल झाली आहेत. मात्र ६ ते १४ वयोगटातील जी मुले प्रामुख्याने शेती / पशुसंवर्धन / उसतोड / वीटभट्ट्या इत्यादींमधील बालकामगार व शहरी भागातील बालकामगार, झोपडपट्टीतील मुले, निराधार मुले, हमाली करणारी मुले, कचरा गोळा करणारी मुले, फेरीवाले, घरगडी अशा कठीण परिस्थितीच्या घटकातील आहेत ती प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. पुढील विविध कारणास्तव अशा मुलांना औपचारिक प्राथमिक शिक्षण देणे अत्यंत अवघड आहे.

* या मुलांना शिक्षणाची पार्श्वभूमी नाही.
* त्यांचे पालक नाहीत किंवा निरक्षर आहेत.
* काही मुले निराधार आहेत.
* मुले स्वत: कमावून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लावीत आहेत.
* या मुलांच्या श्रमस्वरुपातील मदतीशिवाय कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकत नाही.
* स्वत:च्या तुटपुंज्या शेतीत किंवा अन्य उद्योगात काम करतात
* आई-वडील कामावर गेल्यावर घरातील लहान भावंडांना सांभाळण्याचे काम करीत आहेत.
* या वंचित घटकातील मुले विखुरलेली आहेत.
* मुले स्वत: कमावतात परंतु परावलंबी आहेत किंवा परस्वाधीन आहेत.
* लहान वयामुळे स्वत:च्या भवितव्याचा विचार करू शकत नाहीत.

राज्यात ६४,००० हून अधिक प्राथमिक शाळा आहेत. वंचित घटकातील सर्व मुले या शाळांमध्ये दाखल होऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अनौपचारिक शिक्षण केंद्रे सुरू करूनही सर्व वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणता आलेले नाही. अंशकालीन वर्गाच्या स्वरुपात केंद्र व राज्य शासनाने यापूर्वी केलेल्या प्रयोगास फारसे यश मिळालेले नाही. म्हणून आता केंद्र शासनाने अशा वंचित मुलांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत पर्यायी नाविन्यपूर्ण शिक्षण देण्याचे ठरविले आहे. तसेच या वंचित घटकातील मुलांचे शिक्षण ही बाब कठीण असली तरी या मुलांपर्यंत प्राथमिक शिक्षण देण्याचा निर्धार राज्य शासनाने केलेला आहे. या संदर्भात राज्य-स्तरीय समितीने बालकामगारांच्या शिक्षणासाठी सुचविलेली योजना व केंद्र शासनाची शिक्षण हमी योजना व पर्यायी नाविन्यपूर्ण शिक्षण योजना यांच्या समन्वयातून एक नवीन योजना 'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' या नावाने कार्यान्वित करण्याचे शासनाने ठरविले आहे. ही योजना म्हणजे वंचित घटकातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या संधीची हमी आहे व योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षक, स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी, प्रशासन, आर्थिक उपलब्धी अशा अनेक घटकांचा सहभाग आवश्यक आहे. उद्दिष्टाप्रत वाट दूरची असली तरी ही योजना म्हणजे शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठी शासनाने उचललेले पहिले ठोस पाऊल आहे.

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेची व्यापक प्रसिद्धी होऊन तिचे लोक चळवळीत रुपांतर व्हावे या दृष्टीने योजनेची पूर्वतयारी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिनांक २८ सप्टेंबर २००० व ५ ऑक्टोबर २००० च्या परिपत्रकान्वये सर्व संबधितांना देण्यात आल्या. आता या योजनेचा सविस्तर तपशील या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

*राज्यातील बालकामगार आणि अन्य शाळाबाह्य प्रत्येक मुलासाठी त्याच्या सोयीच्या वेळी व सोयीच्या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने समक्रमांक दिनांक १३ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयाद्वारे ''महात्मा फुले शिक्षण हमी योजना'' सुरू केली आहे. सदर योजनेच्या सुरळीत व परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टीने या योजनेमध्ये काही सुधारणा / बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यादृष्टीने दिनांक १३ ऑक्टोबर २०००च्या शासन निर्णयात पुढे नमूद केल्याप्रमाणे सुधारणा/बदल करण्यात येत आहेत.*

२. या योजनेची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे करण्याचे शासनाने ठरविले आहे.

(१) *राज्यामध्ये बाह्यसहाय्यीत जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, आमची शाळा (आशा), प्रकल्प व प्राथमिक शिक्षण समृद्धी प्रकल्प कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या पर्यायी व नाविन्यपूर्ण शिक्षण योजनेच्या धर्तीवर जी केंद्रे सुरू असतील त्या केंद्रांना महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे असे संबोधण्यात यावे. ज्या ठिकाणी मुलांचे सर्वेक्षण झालेले असूनही अशी मुले सुरू असलेल्या केंद्रांमध्ये जात नसतील व शिक्षणापासून वंचित असतील तर त्या मुलांना अशा केंद्रामध्ये सामावून घेतले जावे. काही अडचणींमुळे अशी मुले केंद्रामध्ये सामावून घेणे शक्य नसेल तर आवश्यकतेनुसार*

*नवीन केंद्र सुरू करण्यात यावे. ज्या ठिकाणी अद्याप सर्वेक्षण पूर्ण झालेले नाही किंवा सर्वेक्षण होऊनही काही वंचित मुलांची नावे सर्वेक्षणामध्ये आली नसतील तर अशा ठिकाणी सर्वेक्षण पूर्ण करण्यात यावे व वंचित मुलांच्या नावांची यादी सादर केल्यानंतर सदर यादीस मान्यता मिळताच त्या ठिकाणी केंद्र सुरू करण्याची कार्यवाही करण्यात यावी.*

(२) उर्वरित जिल्ह्यांमध्ये सूक्ष्म सर्वेक्षणाचे काम सुरू करावयाचे आहे. सर्वेक्षणाचे काम व्यापक रुद्र शासनाच्या शिक्षण हमी व पर्यायी नाविन्यपूर्ण शिक्षण योजनेखाली प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त १५ जिल्ह्यांच्या धर्तीवर उर्वरित जिल्ह्यांसाठी सूक्ष्म सर्वेक्षणासाठी प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नमुना विहित करावा व तो सर्व संबंधितांकडे तात्काळ पाठवावा. सूक्ष्म सर्वेक्षणाचे काम, प्राथमिक तसेच माध्यमिक स्तरावरील सर्व शिक्षक, अंगणवाडी व बालवाडी सेविका, ग्राम शिक्षण समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका सदस्य, स्थानिक लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षण प्रेमी व ज्येष्ठ नागरिक यांच्या सहकार्याने पूर्ण करावयाचे आहे. सूक्ष्म सर्वेक्षणाची माहिती तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर गावनिहाय संकलित करण्यात यावी. बालकामगार व शाळाबाह्य मुलांच्या यादीला ग्राम शिक्षण समित्यांची अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शिक्षण समित्यांची मान्यता घेण्यात यावी.

*(अ) महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शाळाबाह्य व शिक्षणापासून वंचित मुलांचे सर्वेक्षण करताना शाळाबाह्य अपंग मुलांचेही सर्वेक्षण करण्यात यावे. अपंग मुलांना प्राधान्याने या योजनेमध्ये समाविष्ट करण्याची दक्षता घेण्यात यावी.*

*(ब) दरवर्षी प्राथमिक शाळेत दाखल करण्यायोग्य वयाच्या मुलांचे सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणानुसार ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांचा आढावा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद यांनी घ्यावा. बालकामगार व शाळाबाह्य मुलांच्या यादीला ग्राम शिक्षण समिती अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शिक्षण समितीची मान्यता घेण्यात यावी. या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांकडून सादर केलेल्या याद्या ग्राम शिक्षण समित्यांकडून मंजूर होऊन आल्या नसतील तर त्या याद्या योग्य असल्याबाबत स्वयंसेवी संस्थेकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.*

*(क) ६ ते १४ वयोगटातील कोणताही बालकामगार शिक्षणापासून वंचित राहणार नाही या दृष्टीने बिनधोकादायक उद्योगांच्या मालकांनी त्यांच्याकडे कामासाठी असलेल्या मुलांची संख्या व यादी कामगार उपायुक्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहील. बिनधोकादायक उद्योगात एखादा मालक एक जरी बालकामगार ठेवीत असेल तर त्याच्यासाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्राची मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे करणे मालकावर बंधनकारक राहील. बालकामगार मुलाला शाळेत जाता येईल यासाठी त्याच्या कामाच्या वेळेत सोयीस्कर बदल करणे व केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देणे ही जबाबदारी मालकाची राहील व याप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी कामगार उपायुक्तांची राहील.*

(३) केंद्र शासनाच्या पर्यायी व नाविन्यपूर्ण शिक्षण योजनेअंतर्गत ज्या गावामध्ये महात्मा फुले शिक्षण हमी योजनेनुसार केंद्र सुरू करणे शक्य आहे अशा ठिकाणाकरिता स्वयंसेवी संस्थांकडून विहित नमुन्यात अर्ज प्राप्त करून घेण्यात यावेत. स्वयंसेवी संस्थांनी करावयाच्या अर्जाचा नमुना प्राथमिक शिक्षण संचालकांनी विहित करावा. संबंधित संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / प्रशासन अधिकारी यांच्याकडे सादर करावेत.

(४) ज्या ठिकाणी केंद्र शासनाचे निकष पूर्ण होऊ शकणार नाहीत अशा ठिकाणी राज्य शासनाच्या अनुदानातून केंद्रे सुरू करण्यात येतील. त्यादृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात अशी किती केंद्रे सुरू करावी लागतील व त्याकरिता अपेक्षित खर्च किती आहे याबाबतचा तपशील सर्वेक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारे तयार करण्यात यावा व त्या आधारे पुढील शैक्षणिक वर्षापासून आवश्यक तो निधी जिल्हा नियोजन समित्यांमार्फत उपलब्ध करून घ्यावा.

(५) सर्वेक्षणानंतर प्रत्येक जिल्ह्यात सुरू करावयाच्या केंद्राबाबत स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / प्रशासन अधिकारी यांनी जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करावेत. प्राथमिक अनुदानाच्या आधारे केंद्र सुरू करण्यास सूचना द्याव्यात. केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत तसेच राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेपर्यंत ही केंद्रे सुरू करावयाची आहेत.

*प्रत्येक जिल्ह्यात सुरू करावयाच्या केंद्राबाबत स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / प्रशासन अधिकारी यांनी जिल्हा स्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद / शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावे. विहित नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्यांच्या आत जिल्हास्तरीय कार्यकारी समिती अर्जावर निर्णय देईल.*

*महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी ज्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची संपादणूक (अध्ययन क्षमता) प्राप्त केली आहे किंवा जी इयत्ता उत्तीर्ण झाल्याचा दाखला केंद्र स्वयंसेवकांनी दिला असेल तो दाखला त्याला नियमित शाळेत पुढील वर्गात प्रवेश देण्यासाठी ग्राह्य राहील.*

(६) हे प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्य केल्यानंतरच संबंधित स्वयंसेवी संस्थांनी प्रत्यक्ष केंद्रे सुरू करावीत.

*या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त जबाबदार राहतील. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद हे जिल्हा कार्यकारी समितीचे सदस्य सचिव तसेच महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी राहतील. महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी हे महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या कार्यकारिणी समितीचे सदस्य सचिव व योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख अधिकारी राहतील.*

३. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत सुरू करावयाच्या केंद्राच्या व्यवस्थापनाकरिता जिल्हा/ महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे सल्लागार समिती व कार्यकारी समिती स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**४. सल्लागार समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

जिल्हा परिषद सल्लागार समिती, महानगरपालिका सल्लागार समितो, नगरपालिका सल्लागार समिती, महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करील व योजनेचा आढावा घेईल. सल्लागार समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका होतील.

**५. कार्यकारी समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करणे.
२. कार्यक्रमाची आखणी करणे.
३. केंद्रांना मंजुरी देणे.
४. केंद्र स्वयंसेवक नियुक्तीस मान्यता देणे.
५. केंद्राचे सनियंत्रण व मार्गदर्शन करणे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद हे जिल्हा कार्यकारी समितीचे सदस्य-सचिव तसेच महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी राहतील. महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी हे महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या कार्यकारी समितीचे सदस्य-सचिव व योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख अधिकारी राहतील.

**६. शिक्षणाधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी या नात्याने तसेच समितीचे सदस्य-सचिव या नात्याने शिक्षणाधिकारी हे खालील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतील.

१) ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलामुलींचे सर्वेक्षण करवून घेणे.
२) केंद्रांच्या मान्यतेचे प्रस्ताव तयार करणे
३) केंद्रांच्या स्वयंसेवकांच्या नियुक्तीचे गटशिक्षणाधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव छाननी करून जिल्हा समितीच्या मान्यतेस्तव सादर करणे.
४) दर ३ महिन्यांनी कार्यकारी समितीच्या बैठका आयोजित करणे.
५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व प्रौढ शिक्षण विभाग इत्यादी यंत्रणेच्या समन्वयाने पर्यायी शिक्षण केंद्रावर पर्यवेक्षण करणे व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
६) योजनेच्या अंमलबजावणीबाबत केंद्रनिहाय आढावा जिल्हा समिती, विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षण संचालक, विभागीय आयुक्त यांना व शासनास योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी सादर करणे.
७) महात्मा फुले शिक्षण हमी योजना यशस्वी करण्यासाठी जिल्हा स्तरावरील शासकीय, निमशासकीय व अशासकीय संस्था तसेच स्वयंसेवी संस्था यांच्याशी संपर्क साधून समन्वय घडवून आणणे.

**७. पर्यवेक्षण :**

केंद्रांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी शिक्षणाधिकारी यांची राहील. गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (प्रौढ शिक्षण) व केंद्रप्रमुख हे त्यांना सहाय्य करतील. पर्यायी शिक्षण केंद्रांवर दैनंदिन पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी ग्राम शिक्षण समितीकडे राहील. केंद्रांचे कामकाज,

विद्यार्थ्यांची प्रगती इत्यादीबाबतचा अहवाल पर्यायी शिक्षण केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालक दर महिन्यातून एकदा ग्राम शिक्षण समितीस सादर करील.

८. केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालकाची निवड व अन्य बाबींबाबत परिशिष्ट 'क' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

९. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीचे काम प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे सोपविण्यात येत आहे.

ही योजना केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानाचाच एक भाग असल्यामुळे व सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत उपलब्ध होणारा निधी केंद्र शासनाकडून राज्यस्तरीय सोसायटीमार्फत मंजूर करण्यात येणार असल्यामुळे निधीच्या वितरणाची व संनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांची राहील.

१०. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - ८६०/२०००, व्यय ५अ, दिनांक २६ सप्टेंबर २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वृंदा पवार)
अवर सचिव, शालेय शिक्षण

प्रति,
प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त, सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षणाधिकारी, सर्व महानगरपालिका
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व जिल्हा परिषदा
ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, समाजकल्याण विभाग मंत्रालय, मुंबई
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक
शालेय शिक्षण विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव /कक्ष अधिकारी
निवड नस्ती - प्राशि -१

# महात्मा फुले शिक्षण हमी योजना
## परिशिष्ट 'अ'

| | | |
|---|---|---|
| १) | योजनेचे नाव | **महात्मा फुले शिक्षण हमी योजना** |
| २) | लाभार्थी | ६-१४ वयोगटातील बालकामगारांसह सर्व शाळाबाह्य मुले |
| ३) | योजनेची अंमलबजावणी कोण करू शकेल. | ★ पंजीकृत स्वयंसेवी संस्था<br>★ पंजीकृत शिक्षण संस्था<br>★ स्थानिक स्वराज्य संस्था<br>★ स्वयंसेवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ४) | योजनेचे उद्दिष्ट | सर्वेक्षणानुसार ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या इयत्ता १ली ते ४थी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय उपलब्ध करून देऊन अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून देणे, *तसेच मुलाचे वय व संपादणूक (अध्ययन क्षमता) लक्षात घेऊन ७ वी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय करणे.* |
| | योजनेचे स्वरुप | ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांसाठी स्वयंसेवी संस्थेकडून / स्थानिक स्वराज्य संस्थेकडून केंद्र सुरू केले जाईल.<br>केंद्रासाठी जागा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने/स्वयंसेवी संस्थेने मोफत उपलब्ध करून द्यावयाची आहे.<br>प्रत्येक केंद्रामध्ये किमान १५ विद्यार्थी व कमाल २० विद्यार्थी असणे आवश्यक आहे.<br>प्रत्येक केंद्र दिवसा किमान चार तास चालविले जाईल.<br>एका केंद्राच्या अध्यापनासाठी एक स्वयंसेवक मानधनावर नियुक्त केला जाईल.<br>या केंद्रामध्ये दाखल झालेल्या मुलांमध्ये दोन वर्षांच्या कालावधीत इयत्ता ४थी पर्यंतची अध्ययन क्षमता विकसित करणे अपेक्षित आहे.<br>सदर केंद्र शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरू करता येईल व तेव्हापासून ते सलग दोन वर्ष चालविणे अपेक्षित आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५) | अभ्यासक्रम/पाठ्यपुस्तके | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने या योजनेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके व इतर साहित्य तयार करावयाची आहेत. तोपर्यंत भारतीय शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके वापरावीत.<br>*स्थानिक गरज लक्षात घेऊन स्वयंसेवी संस्थेने स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित केल्यास त्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची मान्यता घेऊनच तो केंद्रासाठी लागू करण्यात यावा.* |
| ६) | केंद्राचा कालावधी | दोन वर्षे, दररोज ४ तास (घड्याळी) |
| ७) | केंद्र स्वयंसेवक/केंद्र चालक | वय : किमान १८ वर्षे<br>अर्हता : १२ वी उत्तीर्ण<br>महिला व डी. एड. यांना प्राधान्य.<br>नेमणूक स्थानिक उमेदवारांचीच करावी. स्थानिक उमेदवार १२वी उत्तीर्ण उपलब्ध न झाल्यास किमान १०वी उत्तीर्ण स्थानिक उमेदवार नेमता येईल. सेवानिवृत्त शिक्षक / राष्ट्रीय सेवायोजन / एन.सी.सी. / नेहरु केंद्र कार्यकर्ते यांचाही नेमणूकीसाठी विचार करावा.<br>*केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालक म्हणून ज़िल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या स्थानिक शिक्षकांनाही अतिरिक्त जबाबदारी घेता येईल व त्यासाठी मंजूर असलेले मानधन घेण्यास ते पात्र राहतील.* |
| ८) | स्वयंसेवक नेमणूकीचे अधिकार | स्वयंसेवकाची नियुक्ती केंद्र चालविणारी संबंधित स्वयंसेवी संस्था करारपद्धतीवर करील. कराराचा नमुना प्राथमिक शिक्षण संचालक यांनी विहित करावा.<br>स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबतीत स्वयंसेवकाची नियुक्ती संबंधित ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती / नगरपालिका / महानगरपालिका - शिक्षण समिती करील. |

| | | |
|---|---|---|
| ९) | प्रशिक्षण | एकूण ३० दिवसांचे सेवापूर्व प्रशिक्षण व महिन्यातून दोन दिवसांचे उद्‌बोधन.<br>महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करील व प्रशिक्षणाचे आयोजन करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांवर राहील. |
| १०) | आर्थिक निकष | २० मुलांपर्यंत संख्या असलेल्या केंद्रास खालीलप्रमाणे खर्च अनुज्ञेय राहील :<br>✪ इयत्ता १ ली ते ४ थी साठी स्वयंस्वेकाचे / केंद्र चालकाचे मानधन (रु. १०००/- दरमहा प्रमाणे) — रु. १२,०००/-<br>✪ पाठ्यपुस्तके — रु. २,५००/-<br>✪ प्रशिक्षण — रु. १,२२५/-<br>✪ सादिलवार खर्च — रु. २,०००/-<br>✪ पर्यवेक्षण — रु. ९००/-<br>एकूण — रु. १८,६२५/-<br>विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी असेल तर, ७ मुली किंवा १० मुले-मुलींपर्यंत स्वयंसेवकास किमान रु. ५००/- दरमहा मानधन मिळेल. ७ पेक्षा अधिक मुली किंवा १० पेक्षा अधिक मुले-मुली असतील तर प्रत्येक जादा विद्यार्थ्यामागे रु. ५०/- दरमहा याप्रमाणे मानधनात वाढ होईल. तथापि, कमाल मानधन रु. १,०००/- पर्यंत राहील. यापेक्षाही जेथे कमी विद्यार्थी उपलब्ध असतील तेथे प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु. ५०/- दरमहा या दराने मानधन देऊन वर्ग चालविता येतील. |

# महात्मा फुले शिक्षण हमी योजना
## परिशिष्ट 'ब'

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेंतर्गत सुरू करावयाच्या केंद्रासाठी जिल्हा स्तरावर, महानगरपालिका स्तरावर / नगरपालिका स्तरावर खालीलप्रमाणे सल्लागार समिती नियुक्त करण्यात यावी.

**जिल्हा परिषद सल्लागार समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) | सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद | सदस्य |
| ५) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य |
| ६) | एक शिक्षणतज्ञ | सदस्य |
| ७) | जिल्ह्यात या क्षेत्रात काम करणारा स्वयंसेवी संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | कामगार विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद | सदस्य-सचिव |

**महानगरपालिका सल्लागार समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | महापौर, महानगरपालिका | अध्यक्ष |
| २) | सभापती, शिक्षण समिती, महानगरपालिका | सदस्य |
| ३) | आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ४) | *स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी* | *सदस्य* |
| ५) | शिक्षणाधिकारी,महानगरपालिका | सदस्य-सचिव |

**नगरपालिका सल्लागार समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | नगराध्यक्ष, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य-सचिव |
| ३) | कामगार विभागाचा प्रतिनिधी | सदस्य-सचिव |
| ४) | प्रशासन अधिकारी, नगरपालिका | सदस्य-सचिव |
| *५)* | *स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी* | *सदस्य* |

**कार्यकारी समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) | मुख्याधिकारी, नगरपालिका | सदस्य |
| ५) | प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ | सदस्य |
| ६) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ७) | जिल्हा कामगार अधिकारी | सदस्य |
| *८)* | *स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी* | *सदस्य* |
| ९) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद | सदस्य-सचिव |

**महानगरपालिका क्षेत्राकरिता कार्यकारी समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त, महानगरपालिका | अध्यक्ष |
| २) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ३) | कामगार विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| *४)* | *स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी* | *सदस्य* |
| ५) | शिक्षणाधिकारी महानगरपालिका | सदस्य-सचिव |

## परिशिष्ट 'क'
## केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालकाची निवड

| जिल्हा परिषद क्षेत्र | नगरपालिका/परिषदा क्षेत्र | महानगरपालिका क्षेत्र | स्वयंसेवी संस्था |
|---|---|---|---|
| केंद्र स्वयंसेवकाची नियुक्ती जिल्हा कार्यकारी समितीच्या पूर्ण मान्यतेने ग्राम शिक्षण समिती करील. | केंद्र स्वयंसेवकांची नियुक्ती नगरपालिका सल्लागार समितीच्या पूर्व मान्यतेने संबंधित प्रशासन अधिकारी करतील. | केंद्र स्वयंसेवकाची नियुक्ती महानगर पालिका कार्यकारी समितीच्या पूर्व मान्यतेने शिक्षणाधिकारी महानगरपालिका करतील. | केंद्र स्वयंसेवकाची नियुक्ती संबंधित क्षेत्राच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने स्वयंसेवी संस्था करील. |
| केंद्र स्वयंसेवकाच्या नियुक्ती पत्रावर शिक्षणाधिकारी स्वाक्षरी करतील. | केंद्र स्वयंसेवकाच्या नियुक्ती पत्रावर प्रशासन अधिकारी स्वाक्षरी करतील. | केंद्र स्वयंसेवकाच्या नियुक्ती पत्रावर शिक्षणाधिकारी स्वाक्षरी करतील. | केंद्र स्वयंसेवकाच्या नियुक्ती पत्रावर संस्थेचा सक्षम पदाधिकारी स्वाक्षरी करील. |
| केंद्र स्वयंसेवकाचे मानधन ग्राम शिक्षण समितीमार्फत अदा केले जाईल. | केंद्र स्वयंसेवकाचे मानधन प्रशासन अधिकारी अदा करतील. | केंद्र स्वयंसेवकाचे मानधन शिक्षणाधिकारी अदा करतील. | स्वयंसेवी संस्थे-मार्फत स्वयंसेवकाचे मानधन अदा केले जाईल. |
| अभ्यासक्रमाच्या कालावधी साठी नियुक्तीबाबतचे करारपत्र ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व केंद्र स्वयंसेवक यांच्यात राहील. | अभ्यासक्रमाच्या कालावधी साठी केंद्र स्वयंसेवक व प्रशासन अधिकारी नियुक्तीबाबत करारपत्र करतील. | अभ्यासक्रमाच्या कालावधी साठी केंद्र स्वयंसेवक व शिक्षणाधिकारी नियुक्तीबाबत करार करतील. | अभ्यासक्रमाच्या कालावधी साठी नियुक्तीबाबत स्वयंसेवी संस्थेचा सक्षम पदाधिकारी व स्वयंसेवक यांच्यात करार केला जाईल. |
| केंद्र स्वयंसेवकाचे मानधन व सादिल अनुदानाची रक्कम ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व एक सदस्य यांच्या संयुक्त खात्यावर राहील. | केंद्र स्वयंसेवकाचे मानधन व सादिल अनुदानाची रक्कम प्रशासन अधिकारी व शिक्षण मंडळ/शिक्षण समिती सदस्य यांच्या नावावर बँकेत जमा राहील. | केंद्र स्वयंसेवकाचे मानधन व सादिल अनुदानाची रक्कम शिक्षणाधिकारी व शिक्षण मंडळ/शिक्षण समिती सदस्य यांच्या नावावर बँकेत जमा राहील. | — |

# ''महात्मा फुले शिक्षण हमी योजने''ची
# ठळक वैशिष्ट्ये

- ★ राज्यातील ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षणाची हमी.
- ★ योजनेच्या अंमलबजावणीची जिल्हाधिकारी व आयुक्तांवर टाकलेली जबाबदारी.
- ★ स्वयंसेवी संस्थांनी तयार केलेल्या वंचित मुलांच्या याद्या योग्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्याची तरतूद.
- ★ बालकामगार ठेवणाऱ्या बिनधोकादायक उद्योगांच्या मालकांवर मुलांना शिक्षण उपलब्ध करून देण्याचे बंधन.
- ★ केंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समितीला ३ महिन्यांची कालमर्यादा.
- ★ पुढील वर्गात नियमित शाळेत प्रवेश मिळण्यासाठी दाखल्याची तरतूद.
- ★ ७वी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय.
- ★ स्वयंसेवी संस्थांना स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित करण्याची मुभा.
- ★ जिल्हा परिषद / महानगरपालिका शाळांतील शिक्षकांना केंद्र स्वयंसेवक म्हणून अतिरिक्त जबाबदारी घेण्याची परवानगी.
- ★ योजनेंतर्गत स्थापन करावयाच्या समित्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना स्थान.

*अधिकाधिक स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसेवी संस्था - संघटना / व्यक्ती या योजनेत सहभागी होऊन महाराष्ट्रातील वंचित मुलांचे प्राथमिक शिक्षणाचे स्वप्न साकारतील या विश्वासासह.....*

---

वितरण : बाल हक्क अभियान

द्वारा - समर्थन, ८७/३, मुंबादेवी म्युनिसिपल शाळा, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२

✆ २४२ ५२९२, २४२ ८२९१. E-mail - vsansad@bom3.vsnl.net.in